# वानवडी पोलीसांकडुन चोरीस गेलेल्या ०५ मोटारी सायकली जप्त

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी इसम नामे राजेश सिताराम देवकर वय २४ वर्षे रा.कुंजीर वस्ती मांजरी बुाा पुणे यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन वानवडी पोलीस ठाणेकडील ०१, हडपसर पोलीस ठाणेकडील ०३ व कोंढवा पोलीस ठाणेकडील ०१ असे एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

वानवडी पोलीस ठाणेकडील पो.शि.शिरीष गोसावी यांना विश्वसनीय माहीती मिळाली की, इसम नामे राजेश सिताराम देवकर हा वानवडी, कोंढवा, हडपसर, मांजरी परिसरातुन मोटार सायकलींची चोरी करीत आहे.तसेच तो बी.टी.कवडे रोड परिसरात येणार असल्याची माहीती त्यांना मिळाली त्या अनुषंगाने वानवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा लावुन त्यास एका मोटार सायकलसह पकडले त्याचेकडे केलेल्या तपासात तो वापरत असलेली.मोटार सायकल ही वानवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ४१५/२०१७ भा.दं.वि.कलम ३७९ मधील चोरीची असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपीकडे सखोल तपास करता त्याने हडपसर, वानवडी, कोंढवा परिसरातुन मोटार सायकलींची चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याप्रमाणे एकुण १,३८,०००/- रुपये किमतीच्या ०५ मोटार सायकली जप्त करुन एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त श्री दिपक साकोरे साो, परिमंडळ-४ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री समीर शेख साो, वानवडी विभाग पुणे शहर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सयाजी गवारे साो, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक, श्री अजय म्हेत्रे, पो.हवा.बापु खेसे, पो.ना.युवराज दुधाळ, पो.ना.ज्ञानेश्वर गिरमकर, पो.शि.शिरीष गोसावी, पो.शि.योगेश गायकवाड, पो.शि.कानिफनाथ कारखेले, पो.शि.प्रतिक लाहीगुडे, पो.शि.नासीर देशमुख, पो.शि.कैलास माळकर यांच्या पथकाने केली.

## वानवडी पोलीसांकडुन ०१ देशी बनावटीचे पिस्टल जप्त

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर कडील अधिकारी व कर्मचारी यांनी इसम नामे राजेश दिलीप पवार वय २१ वर्षे रा.पवार वस्ती केशवनगर मुंढवा पुणे यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व दोन राऊंड हस्तगत करण्यात आले आहेत.

वानवडी पोलीस ठाणेकडील पो.शि.शिरीष गोसावी यांना विश्वसनीय माहीती मिळाली की, पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे राजेश दिलीप पवार व टिपु पठाण रा.सय्यदनगर महंमदवाडी रोड हडपसर पुणे पुर्ण नाव पत्ता माहीत नाही हे त्यांचेजवळ बेकायदेशिर एक देशी बनावटीचे पिस्टल घेवुन सय्यदनगर गल्ली नंबर ९ येथे येणार असल्याची माहीती मिळाल्याने त्या अनुषंगाने वानवडी पोलीस ठाणेकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा लावुन गुन्हेगार नामे राजेश दिलीप पवार यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचेजवळ एकुण ३५,२००/- रुपये किमतीचे एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व दोन राऊंड तसेच रोख रक्कम २००/- रुपये मिळुन आल्याने ती दाखल गुन्ह्याचे पुरावेकामी जप्त करण्यात आलेली आहे.

आरोपीकडे सखोल तपास करता त्याने सदरची पिस्टल ही त्याचा साथीदार नामे टिपु पठाण रा.सय्यदनगर महंमदवाडी रोड हडपसर, पुणे याने त्याचेकडे ठेवण्यासाठी दिल्याचे सांगीतले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त श्री दिपक साकोरे सो, परिमंडळ-४ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री समीर शेख सो, वानवडी विभाग पुणे शहर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सयाजी गवारे सो, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, मा.पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री ऊमेश तावसकर सो, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक, श्री शेखर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक श्री अजय म्हेत्रे, पो.हवा.बापुसाहेब खेसे, पो.हवा.रमेश भोसले, पो.शि.शिरीष गोसावी, पो.शि.योगेश गायकवाड, पो.शि.कानिफनाथ कारखेले, पो.शि.प्रतिक लाहीगुडे, यांच्या पथकाने केली.